# संस्कार मंदिर संस्थेचे

# कला व वाणिज्य महाविद्यालय

वारजे माळवाडी, पुणे ५८

## *विशेष मार्गदर्शन योजना अहवाल २०१६ - २०१७*

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाअंतर्गत 'विद्यार्थी विकास मंडळ' या विभागामार्फत आमच्या महाविद्यालयात '*विशेष मार्गदर्शन योजना*' राबविण्यात आली. सदर योजनेकरिता शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ मध्ये विद्यापीठाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला. त्यानुसार विद्यार्थी विकास मंडळांतर्गत विकमं/२०१६-१७/२५० दि.३०/०८/२०१६रोजी या योजनेला विद्यापीठाने मान्यता दिली.

आमच्या महाविद्यालयामध्ये दि. १९/१२/२०१६ रोजी या उपक्रमाचा उद्घाटन समारंभ झाला. कार्यक्रमाचे उद्घाटन संस्कार मंदिर संस्थेचे अध्यक्ष श्री. दिलीपभाऊ वराटे हस्ते झाले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप भोईटे अध्यक्षस्थानी होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ललिता कानगुडे, प्रास्ताविक प्रा. कविता मुनेश्वर, व आभारप्रदर्शन प्रा. प्रांजली विद्यासागर यांनी केले.

विशेष मार्गदर्शन योजनेत विद्यार्थ्यांनी विविध घटकांतर्गत इंग्रजी, इतिहास, अर्थशास्त्र, भूगोल, वाणिज्य, पर्यावरण, व्यक्तिमत्व विकास, इत्यादी विषयांवर मार्गदर्शन करण्यात आली. सदर योजना दि. १९/१२/२०१६ ते ०९/०१/२०१७ या कालावधीत राबविण्यात आली.

दि. ०९/०१/२०१७ रोजी सदर उपक्रमाचा समारोप समारंभ झाला. त्याप्रसंगी विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतामध्ये सदर व्याख्यात्यांच्या मार्गदर्शनाचा कसा उपयोग झाला याविषयी आपली मते मांडली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप भोईटे होते. तसेच विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा. प्रांजली विद्यासागर यांनी वर्षभर झालेल्या योजनांचा आढावा घेऊन सदर योजना विद्यार्थ्यांसाठी कशी महत्त्वाची आहे हे स्पष्ट केले. या उपक्रमात ५० विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

Bidyasagar
विद्यार्थी कल्याण अधिकारी
(S.W.O.)
कला व वाणिज्य महाविद्यालय
वारजे माळवाडी, पुणे-५८

कला व वाणिज्य महाविद्यालय वारजे-माळवाडी पुणे-५८
आयडी क्र. PU/PN/ACI 149/2000 19/9/2000

PRINCIPAL
Arts & Commerce College
Warje-Malwadi, Pune-58

POCO
SHOT ON POCO M2